नागपूर वृत्तान्त

इंडियन एक्स्प्रेस ग्रुप

शनिवार, ७ फेब्रुवारी २००९

लोकसत्ता



# पद्मश्री डॉ. गुप्ता यांनी केल्या पाच हजार नि:शुल्क शस्त्रक्रिया

**नागपूर, ६ फेब्रुवारी / प्रतिनिधी**

पद्मश्री व विख्यात सर्जन डॉ. अशोक गुप्ता यांनी गेल्या २५ वर्षात एक लाख प्लॅस्टीक शस्त्रक्रिया करण्याचा विक्रम केला आहे. यातील पाच हजार शस्त्रक्रिया त्यांनी नि:शुल्क केल्या आहेत.



१९७८ मध्ये नागपुरातील मेडिकल महाविद्यालयामधून वैद्यकीय पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी जपान आणि अमेरिकेत उच्चशिक्षण घेतले. त्यानंतर ते मुंबईतील ग्रॅन्ड मेडिकलमध्ये रुजू झाले. ते सध्या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून राजस्थान, मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील विदर्भ व खानदेशमधील आदिवासी भागात नि:शुल्क प्लॅस्टीक शस्त्रक्रिया करीत आहेत. याबरोबरच १९९३ मध्ये मुंबईत झालेले बॉम्बस्फोट, कारगील युद्ध, भूजमध्ये झालेला भूकंप, २००२ मध्ये अक्षरधाम मंदिरात दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात जखमी झालेल्या तसेच २००३ मध्ये पुन्हा मुंबईत झालेल्या बॉम्ब हल्ल्यातील जखमींवर शस्त्रक्रिया केल्या असल्याचे डॉ. अशोक गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

डॉ. गुप्ता म्हणाले, नागपुरातील पद्मश्री डॉ. विक्रम मारवाह हे त्यांचे गुरू असून वेळोवेळी त्यांनी योग्य सल्ला दिल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. सध्या ते बॉम्बे हॉस्पिटलमध्ये वरिष्ठ शल्यचिकित्सक म्हणून काम करीत आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात (मेडिकलमध्ये) सर्वप्रथम १९५७ मध्ये प्लॅस्टिक सर्जरी हा विभाग सुरू झाला.

केंद्र शासनाच्या मदतीने मेडिकलचा आणखी विकास होईल, अशी आशाही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. प्लॅस्टीक सर्जरी हा प्रकार पाहीजे तेवढा सोपा नाही. ज्या समाजाने मानसन्मान दिला त्या समाजाचे ऋण फेडणे हे कर्तव्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी डॉ. अशोक गुप्ता यांची पत्नी डॉ.कांचन, डॉ. समीर जहागीरदार प्रामुख्याने उपस्थित होते. केंद्र सरकारतर्फे पद्मश्री हा पुरस्कार मिळाल्याबद्दल नातेवाईक व हितचिंतकांनी शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन त्यांचा सत्कार केला. ■